# आरे-बीकेसी दरम्यान मेट्रोचा नोव्हेंबरपासून सराव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेतील आरे ते बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याच्या दृष्टीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्याची ट्रायल रन अर्थात चाचण्या नोव्हेंबरपासून सुरू करण्यात येणार आहेत. एमएमआरसीकडून मुंबईतील पहिल्या ३३.५ किमीच्या भूमिगत मार्गाची उभारणी केली जात आहे. दोन टप्प्यात या मार्गिकेचे काम करण्यात येत असून सध्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होत आले आहे.

ही मार्गिका डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचा एमएमआरसीचा मानस आहे. त्यामुळेच आता एमएमआरसीने हा पहिला टप्पा सुरू करण्यासाठी विविध प्रकारच्या चाचण्यांना सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. नोव्हेंबरपासून मेट्रो ३ मधील चाचण्यांना सुरुवात होणार असल्याच्या वृत्ताला एमएमआरसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लोकसत्ताशी बोलताना दुजोरा दिला.